Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18848877

# प्रशासन आणि सुशासनातील सुधारणा

## प्रा. डॉ. दीक्षित साहेबराव ज्ञानोबा[1]

**गोषवारा :**

जनकल्याणकारी राष्ट्र निर्मिती करिता प्रभावी प्रशासन आणि सुशासन महत्त्वाचे असते. प्रशासनाच्या कार्यातून शासनाच्या विकासात्मक योजना, विकासाची धोरणे, नियोजन आणि अमलबजावणी पूर्णत्वास येते. शासनाची ध्येय धोरणे साध्य होतात. नागरिकांना शासकीय विकास योजनांचा लाभ मिळतो. निर्धारित लाभधारकांना विकास योजना मिळतात. प्रशासन हे नागरिक आणि शासन यांच्यामधील दुवा आहे. प्रभावी शासनाच्या कार्यावर शासनाच्या ध्येय धोरणाची अंमलबजावणी होते. तसेच नागरिक, समाज, समुदाय यांचा विकास घडवून येतो.

समाज, समुदाय, राज्य, राष्ट्र यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सुशासन महत्त्वाचे असते. सुशासन म्हणजे सर्वच घटकांचा सर्वांगीण विकास करून विकास कार्याचे आयोजन, नियोजन आणि अंमलबजावणी करणारे शासन होय. सुशासनात लोकशाही, सत्ता विकेंद्रीकरण, नागरिकांचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहभाग समाविष्ट असतो. सुशासन नागरिक, समाज, समुदाय यांच्यामध्ये समता, न्याय आणि समतोल विकास करण्याचे कार्य करते. प्रशासन व शासन यांच्या कार्यात पारदर्शकता, तत्परता, कार्यपूर्ती करते. शासन व प्रशासनात ई-गव्हर्नन्स, डिजिटल लायजेशन, तांत्रिक सेवा सुविधा यांचा अवलंब करून भ्रष्टाचार, वशिलेबाजी, विलंब यांचे निर्मूलन केले जाते. यातून जनकल्याणकारी शासन व प्रशासन प्रबळ बनते.

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय विकासामध्ये प्रशासन आणि सुशासन हे प्रमुख घटक आहेत. शासन, समाज, समुदाय, राज्य, राष्ट्र यांच्या विकासाची ध्येय धोरणे आखते. आखलेल्या विकास धोरणाचे नियोजन करून ते अमलात आणण्याचे कार्य करते. तर प्रशासन शासनाने निर्धारित केलेली विकासात्मक ध्येय धोरणे, विकासाचे आराखडे, आयोजन, नियोजन आणि घेतलेले निर्णय प्रत्यक्षात आणण्याचे कार्य करते. प्रशासनाच्या कार्यावर शासनाच्या कार्याचे यश, अपयश अवलंबून असते. म्हणूनच प्रशासन हे पारदर्शक, कार्यक्षम, कर्तव्यदक्ष असणे महत्त्वाचे असते. अशा प्रभावी प्रशासन आणि सुशासनातील घडून आलेल्या सुधारणांचे अध्ययन होणे उचित ठरते. या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधाच्या मांडणी करिता "प्रशासन आणि सुशासनातील सुधारणा" या विषयाची निवड करण्यात आली आहे. सदरील संशोधनाच्या उद्दिष्टांची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. राष्ट्रीय व जनकल्याणाकरिता प्रशासनातील सुधारणांचे अध्ययन करणे.
2. जनकल्याणकारी विकास कार्याचे आयोजन करण्याकरिता शासनातील सुधारणांचा अभ्यास करणे.
3. प्रशासन आणि शासन यांच्या सुधारणांचा परिणाम अभ्यासणे.

सदरील उद्दिष्टांच्या पूर्तते करिता पुढील प्रमाणे गृहीतकांची मांडणी करण्यात आली आहे.

[1] लोकप्रशासन विभाग प्रमुख), वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदुर , ता. आंबेजोगाई, जि. बीड

**गृहीतके :**

1. प्रशासन आणि शासन यांच्या मधील सुधारणा जनकल्याणकारी आहेत.
2. प्रशासन आणि शासन यांच्या सुधारणातून विकासाला गती प्राप्त झाली आहे.
3. प्रशासन आणि सुशासनातील सुधारणांमध्ये ई-गव्हर्नन्स डिजिटल प्रशासन यांचा सहभाग आहे.

सदरील गृहीतकांच्या पडताळणी करिता पुढील प्रमाणे संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनाकरिता वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनाच्या तथ्य संकलनाकरिता द्वितीय स्त्रोता मधील प्रकाशित व अप्रकाशित स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. प्रकाशित स्रोतांमध्ये संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, शासनाचे अहवाल इत्यादींचा वापर करण्यात आला. तर अप्रकाशित स्त्रोतांमध्ये एम.फिल., पीएच.डी.चे प्रबंध, खाजगी संस्थाचे अहवाल, इंटरनेट यांचा अवलंब करण्यात आला. सदरील शोधनिबंधाच्या मांडणी करिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे.

**विषय प्रतिपादन :**

प्रशासन आणि शासन यांच्यामधील सुधारणाकरिता सातत्याने नवनवीन धोरणे आखली जात आहेत. प्रशासन आणि शासन यांच्यामध्ये पारदर्शकता, कर्तव्यदक्षता, कार्यक्षमता, गतिशील सेवा, भ्रष्टाचार निर्मूलन करण्याकरिता ई-गव्हर्नन्स, डिजिटल प्रशासन, तांत्रिक सहाय्यता, कार्यपद्धती, जनकल्याण व जनजागृती केली जात आहे.

**प्रशासन व शासनाचे स्वरूप :**

शासन हे जनकल्याणकारी योजनांची ध्येय, धोरणे आखून त्यांचे आयोजन, नियोजन करण्याचे कार्य करते. शासनाने आखलेली ध्येय, धोरणे अमलात आणण्याचे कार्य प्रशासन करते. शासनाने आकृती बंद केलेल्या योजना लाभार्थींपर्यंत पोहोचविण्याचे कार्य प्रशासन करते. शासन आणि प्रशासन कर्तव्यदक्ष, जनकल्याणकारी, विकासाभिमुख, पारदर्शक असेल तर नागरिक, समाज, समुदाय, राज्य, राष्ट्र यांचा विकास सहज घडवून येतो. याकरिता सातत्याने शासन व प्रशासन यांच्यामध्ये सुधारणा करण्याचे कार्य केले जात आहे.

**प्रशासन आणि शासन यामधील सुधारणा :**

प्रशासन आणि शासन हे पारदर्शक बनविण्याकरिता तांत्रिक सेवा सुविधांचा अवलंब केला जात आहे. तसेच नागरिक, समाज, समुदाय यांच्यामध्ये शासकीय कार्य आणि प्रशासनाची कार्यपद्धती यासंबंधी जनजागृती केली जात आहे. ही सुधारणावादी कार्य पुढील प्रमाणे नमूद करता येतात.

**1 कार्याची जाणीव :**

शासन व प्रशासनाला आपली कार्य कोणती आहेत, कोणती कार्य करावी या संबंधी जाणीव करून दिली जाते. याकरिता प्रशासकीय अधिकार यांचा अवलंब केला जात आहे.

**2 जबाबदारी :**

शासन आणि प्रशासन यांनी आपली जबाबदारी पारदर्शकपणे पार पाडावी याकरिता माहितीचा अधिकार, तक्रार, नोंदी, चौकशी समिती यांचा अवलंब केला जात आहे.

**3 माहितीचा अधिकार :**

शासन व प्रशासन कोणत्या स्वरूपात कार्य करीत आहे. शासन आणि प्रशासनाने कोणती कार्य केली आहेत. त्यावर कोणत्या तरतुदी केल्या आहेत. याची संक्षिप्त माहिती नागरिकांना मिळावी याकरिता माहितीचा अधिकार वापरला जात आहे.

**4 प्रशासन व शासन यामध्ये नागरिकांचा अप्रत्यक्ष सहभाग :**

शासन आणि प्रशासनाची विकासात्मक ध्येय, धोरणे, विकास आराखडे, योजना, त्यावरील आर्थिक तरतुदी, त्यांची अंमलबजावणी इत्यादीची माहिती नागरिकांना मिळावी याकरिता नागरिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शासनाला व प्रशासनाला माहिती विचारण्याचा अधिकार दिला आहे.

**5 ई-गव्हर्नन्स व प्रशासन :**

शासनाच्या कार्याची सविस्तर माहिती शासनाच्या सांकेतिक स्थळावर प्रदेश प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच शासकीय योजना, विकास कार्य, त्यांचे लाभार्थी इत्यादीची माहिती शासनाच्या सांकेतिक स्थळावर प्रशासनाने प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे शासन व प्रशासन यांच्या कार्याची माहिती नागरिक, समाज, समुदाय यांना मिळत आहे.

**शासन व प्रशासनाचे डिजिटल लायजेशन :**

शासन आणि प्रशासन यांनी आपल्या कार्याची, विकास योजनांची, निवेदकांची, केलेल्या कार्याची, आखलेल्या योजना, विकासात्मक धोरणे, कार्याची व्याप्ती, लाभार्थी इत्यादी माहिती वर्तमानपत्रे, संगणक, इंटरनेट, विविध ॲप, शासनाची सांकेतिक स्थळे इत्यादीवर प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. तसेच नागरिक, समाज, समुदाय यांना आपली मते, तक्रारी, आक्षेप शासनाच्या वेबसाईटवर नोंदविण्याचे अधिकार व सुविधा देण्यात आल्या आहेत. यामुळे प्रशासन व सुशासन विकसित झाले आहे.

**प्रशासन व शासनातील सुधारणांचा परिणाम :**

**1 कर्तव्यदक्ष प्रशासन व सुशासनाची निर्मिती :**

प्रशासन व शासनातील सुधारणामुळे कर्तव्यदक्ष, जनकल्याणकारी प्रशासन व सुधारणाची निर्मिती झाली आहे.

**2 पारदर्शकता :**

शासन व प्रशासनातील सुधारणामुळे शासनाच्या योजना, विकासात्मक धोरणे, आर्थिक तरतुदी, प्रशासनाचा कारभार यामध्ये पारदर्शकता निर्माण झाली आहे.

**3 भ्रष्टाचाराचे निर्मूलन :**

शासन व प्रशासनामधील सुधारणामुळे विकास योजना लाभार्थी गटांना मिळत आहेत. शासनाच्या व प्रशासनाच्या कार्यात गती निर्माण झाली आहे. वशिला, कार्यात दिरंगाई, भ्रष्टाचार यांचे निर्मूलन झाले आहे.

**4 लोकशाही व सत्ता विकेंद्रीकरण :**

शासन व प्रशासनातील सुधारणामुळे नागरीकांना शासन व प्रशासनात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहभाग प्रस्थापित झाला आहे. यामुळे लोकशाहीचे दरडीकरण घडून येत आहे

**5 तांत्रिक सेवा सुविधांचा विकास :**

शासन व प्रशासन यांच्यामधील सुधारणामुळे शासकीय सांकेतिक स्थळे, वेगवेगळे प्रशासकीय, शासकीय तसेच प्रसार माध्यमे कार्याचे डिजिटल लायजेशन इत्यादी तांत्रिक सुविधा घडून आले आहेत.

**निष्कर्ष :**

1. शासन व प्रशासनातील सुधारणामुळे शासकीय व प्रशासकीय कार्यात पारदर्शकता निर्माण झाली आहे.

2. शासन व प्रशासन यांच्यामधील सुधारणामुळे भ्रष्टाचार, वशिला, लाचलुचपत यांचे निर्मूलन झाले आहे.

3. शासन व प्रशासन यांच्या सुधारणामुळे जनकल्याणकारी, कर्तव्यदक्ष, क्रियाशील शासन व प्रशासनाची निर्मिती झाली आहे.

4. शासन व प्रशासन यांच्या सुधारणामुळे समतोल विकास, सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रवाद या मूल्यांचा विकास घडून आला आहे.

**अध्ययनाचे महत्त्व :**

प्रस्तुत अध्ययन शासन आणि प्रशासन यांच्यामधील सुधारणा यासंबंधी अध्ययन करणारे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, विचारवंत, लेखक इत्यादींना सहाय्यभूत ठरेल. तसेच शासनाला समाज, समुदाय, राज्य, राष्ट्र यांच्या विकासाकरिता उपयुक्त ठरेल.

**संदर्भसूची :**

1. प्रा. मिसाळ हनुमंत, "समाजशास्त्रीय संशोधन पद्धती", चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. 2013
2. बंग के. आर., "भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया", विद्या पब्लिकेशन्स, औरंगाबाद. 2016
3. बिरदवाडे जयश्री, "भारतीय प्रशासन", कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद. 2024
4. विळेगाव वेंकट, "भारतीय प्रशासन", अरुणा प्रकाशन, लातूर. 2008
5. https://mr.wikipedia.
6. https://www.shivajiunisoul.com.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*